| MHPU120001822025 | नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२५ मधील निशाणी क्रमांक १९ वरील आदेश (नंदा बाळासाहेब मांढरे व इतर विरुध्द मंगल बाळासाहेब मांढरे व इतर) |
|---|---|

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे ते समन्स मिळाल्यानंतर दाव्यात हजर झाल्यानंर कागदपत्र मिळविण्याकरीता वेळ मागितला होता. तसेच त्या दरम्यान दावा हा तडजोडीकरीता ठेवण्यात आला होता. तसेच प्रतिवादी क्र.२ यांच्या पत्नीस मेडीकल आणीबाणी आली होती. त्यामुळे प्रतिवादी यांना दाव्यात कैफियत दाखल करण्यास ३ महिन्याचा विंलब झालेला आहे. सदर कैफियत दाखल करुन घेतल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाली करण्याकरीता मदतच होणार आहे. सबब, त्यांनी सदर विलंब माफ करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** पुरेशी संधी असताना देखील वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. सबब, सदर अर्ज वादी यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येत आहे.

**०४.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द विना कैफियत आदेश दिसून येत नाही. परंतु कायद्यातील तरतूदीनुसार प्रतिवादी यांनी समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अथवा न्यायालयाने मुदत दिल्यास ९० दिवसाच्या आत त्यांची कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी विहित मुदतीत त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुतचा दावा हा ठराव, वाटप व मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

**१.** प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना दाव्यास कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.02.20 18:03:31 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – २०.०२.२०२६.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**